दै. गोदातीर दि. 15/12/2025

# गंभीर गुन्ह्यात पाहिजे असलेला आरोपी अटकेत; पिस्तूल आणि काडतूस जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)**- नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या दप्तरी गंभीर गुन्हा दाखल असलेला पाहिजे आरोपीच्या शोधात गुन्हे शोध पथक गस्त घालत असताना त्यांनी बोंढार शिवारातून आरोपीला अटक केली. आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून विनापरवाना एक पिस्तूल आणि जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई १२ डिसेंबर रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास करण्यात आली.

नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोउपनि ज्ञानेश्वर मटवाड, हवालदार अर्जुन मुंडे, शेख सत्तार, अंमलदार समीर अहमद, गवेंद्र सिरमलवार, शंकर माळगे हे नांदेड ग्रामीण हद्दीत पाहिजे आरोपी शोध व पेट्रोलींग करत होते. त्यांना मिळालेल्या माहितीवरून बोंढार बायपास रोडकडे येणारे कांदा मार्केट रस्त्यावर गंभीर दुखापतीच्या गुन्ह्यातील आरोपी हा विनापरवाना गावठी पिस्टल व जिवंत काडतुस हे विक्री करण्याच्या उद्देशाने थांबला आहे, अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने त्या ठिकाणी कारवाई करण्यासाठी सापळा रचून शेख समी उर्फ अरबाज शेख रउफ (वय २४ रा. असद मदनी कॉलनी मदनी मस्जीद जवळ देगलूर नाका नांदेड) यास ताब्यात घेवुन त्यांची अंगझडती घेतली असता त्याच्या ताब्यात एक गावठी पिस्टल व एक जिवंत काडतुस मिळून आले. ते पंचासमक्ष जप्त जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद आरोपी हा पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे दाखल गु.र.न. ४५८/२०२५ कलम ११८(२), ११५(२), ३(५) बी.एन.एस सह कलम ४/२५.२७ आर्मस ॲक्ट प्रमाणे दाखल गुन्ह्यात पाहिजे आरोपी होता.